।। श्री विश्वनाथो विजयते ।।

इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
प्रकाशन क्रमांक : ३६

## जागतिक
# बालक वर्षानिमित्त

लेखक
आचार्य शिवाजी न. भावे
माजी अध्यक्ष
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे



## जागतिक
# बालक वर्षानिमित्त

लेखक

पूज्य श्री. आचार्य शिवाजी न. भावे

प्रकाशक
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळे.

प्रकाशक : इ. वि. का. रा. सं. मं. धुळे

प्रथमावृत्ती
सन १९७९ दि. १८ जून
शके १९०१ ज्येष्ठ वद्य ९ सोमवार
द्वितीय आवृत्ती
१/१/२०१२

संगणीकरण : जुथिका राजवाडे-जोशी (पुणे)

मुद्रक : का.स.वाणी संस्था,
नकाणे रोड, देवपूर, धुळे

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ धुळे, प्रकाशन क्र. ३६

सन १९७९, हे जागतिक बालकवर्ष म्हणून मानले आहे. इ.वि. का. राजवाडे मंडळाचे सन्माननीय सभासद आणि सन्माननीय अध्यक्ष पूज्य श्री. आचार्य शिवाजी न. भावे यांनी वेळोवेळी लिहून ठेवलेली ५१ सूत्रे या जागतिक बालकवर्षानिमित्त प्रसिद्ध करावी आणि जनता जनार्दनाची सेवा संस्थेतर्फे करावी या हेतूने, हे प्रकाशन आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. ही सूत्रे लिहून आचार्यांनी मानवी मनाचे संशोधनच केले आहे. या प्रकाशनातील भावना या मानवी मनाच्या नित्याच्याच भावना आहेत हे उघडच आहे. मात्र विस्मृति हा गुण की दोष या विवेचनात न शिरता आम्ही इतकेच म्हणतो की : -

साध्याही विषयात आशय पहा, मोठा किती आढळे।
नित्याच्या अवलोकनात ही जन पहा होती कसे आंधळे ।।
- केशवसुत

इति अलम्
१८ जून १९७९
सोमवार ज्येष्ठ वद्य ९ शके १९०१

**श्री. भा. भट**
मुख्य चिटणीस
इ.वि. का. रा. सं. मं. धुळे.

'जागतिक बालक वर्षानिमित्त' हे पुस्तक पूज्य श्री आचार्य शिवाजी न. भावे यांनी लिहिलेले असून इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाने दि. १८ जून १९७९ रोजी प्रथम आवृत्ती प्रसिद्ध केली होती. आज ३३ वर्षानंतर ह्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. वाचकांना, अभ्यासकांना ती निश्चितच आवडेल.

दुसरी आवृत्ती
१ जानेवारी २०१२

**संजय मुंदडा**
कार्याध्यक्ष,
इ.वि.का.राजवाडे संशोधन मंडळ धुळे.



## जागतिक

# बालक वर्षानिमित्त

१) गूढाहून गूढ अशा अव्यक्तांतून हे नवजात बालका! तुझे अवतरण म्हणजे मार्दवाचे मार्दव आणि मधुरतेचे मधुर आत्मनिवेदनच नव्हे का?

२) हे बाळा! हे बालिके! तुझ्या ठिकाणी अनंताची अरूपच रूपराशी कोंदून गेली आहे. मातृमूर्तीचे सगळे ध्यान आता तुझ्यावरच लुब्ध झाले आहे.

३) हे बाळा! हे बालिके! मंद मंद तेवणाऱ्या समईच्या प्रकाशात तुझी जागृती, तुझी निद्रा, तुझ्या अवयवांची हालचाल, तुझे हसणे, रडणे सगळे काही आता मातेच्या प्रियतेची प्रियता बनली आहे.

४) हे बाळा! हे बालिके! तुझ्यावरून सगळा जीव ओवाळून टाकावा असे वाटणाऱ्या मातेला विश्वमातेचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. तिची ही सगळी शक्ती तुझ्याच विकासाचा बहर आहे.

५) आई दिसली नाही की, रडून आकांत केल्याबरोबर बालकासाठी आई धापा टाकीत धावत येते. बालकाला झोके देऊन हालविते. कोणाला कल्पना ही नसते की तो बालकरूप प्रत्यक्ष जगत्सूत्रालाच हालविते.

६) मातृहृदयरुधिरांतून होणारे मुग्ध बालबालिकेचे दुग्धरूप पोषण सगळ्या विश्ववात्सल्याच्या मांगल्याचे माहेर बनते. मग बाळ मातृनिष्ठेच्या अंकावरच सुखाने पहुडतो.

७) अंगाई गीतांनी प्रेमस्वरूप समाधीत निमग्न झालेल्या बालकाला कोठे ठेवू आणि कोठे न ठेवू, अशा संभ्रमात पडलेल्या मातेला बालकाच्या मुखावर सुखस्वप्ने उमटलेली दिसतात. ती का पूर्वजन्मीची आठवण? का ती मूळ प्रकृतिपुरुषयोगाच्या स्नेहग्रंथीची साठवण? म्हणावे तरी काय? - खरोखर

मातेला तिचे बाळ हा सर्व प्रकाराने मोठा प्रश्नही आहे आणि सर्व प्रश्नांचे सर्वोत्तम उत्तर हि आहे!

८) नवजात बालबालिकेच्या नामकरणप्रसंगी विष्णूची हजार नावे, गंगा-यमुना-सरस्वती, अवतार, वीर, योगी सर्व भारत आठवतो. - मग मातेच्या एखादे मायेचे, मोहक मोहन नाव पसंत पडते. - मोहन, मुक्ता, रेखा, गीता, गंगा देखा।।

चोवीस-नामी सहस्र-नामी। अनंतनामी तो अनामी
तो कैसा आहे अंतर्यामी । विवेकें ओळखावा - श्रीसमर्थ

९) आईचे चित्त बाळाचे नाव घेताना कंपित होते. चांगल्या नावाने बाळाचे काही वाईट तर होणार नाही ना? तुकोबा म्हणतात -

काळाचे ही काळ । आम्ही विठोबाचे बाळ

१०) बाळाला खेळात गुंतवून आईला काम करावे लागते. रिंगणे, पोपट, चिमणी, खेळणी पाहून बाळाचे चित्त थोडा वेळ एकाग्र होऊन जाते. पण आईचे चित्त मात्र सदोदित व्यग्र असते.

इकडे काम तिकडे बाळ

११) बालकाचा रडवा स्वर ऐकला रे ऐकला की आई धावून येते. रडता घेई उचलूनी कडेवरी.

१२) हे बालका! तुला आईच सर्व शक्तिमान् परमेश्वर! आणि आईचा ही तूच एकमेव देव! - तरी पण ती तुला देवघरात घेऊन जाते. देवमूर्तींच्या पायावर घालते. तुझे चिमुकले हात जोडायला लावते. तिच्या गालावरून अश्रू ओघळतात. हे बाळा!

भक्तिचेनि योगे देव । निश्चये पावती मानव
हीच तिची तुझ्याविषयी परमोच्च भावना!



१३) हे बालका! तुझ्या मनोरंजनासाठी आई मधुर मंजिरा वाजवते. देवाच्या वियोगाची विरहगीते गाते. भजने म्हणते.

पांडुरंग मनमोहन नेत्र भरूनी पाहिन कां?
हाती घेऊनि वीणा टाळ। भजन करूनि सर्व काळ
ठेवूनि सम-चरणि भाळ। बुक्का माळ वाहिन कां?
पतित जनों को करो पुनीता
हे राम-सीता। हे कृष्ण-गीता

१४) गरीब असो, श्रीमंत असो, बालकाला मातेच्या पदराआड सगळे अव्यक्त अनंत वैभव दडलेले दिसते. तो तिच्याच हृदयांत होता. तिच्याच हृदयाचा त्याला सतत आधार हवा असतो.

१५) बालकाला जरा काही झाले की आईच्या हृदयात कापरे भरते. ती जेवत नाही. ती सतरा लोकांना बोलावील. हा उपाय करू का तो करू म्हणून केविलवाणी झालेली तिची वाणी, तिचीच आई बंद करून म्हणते की बाळ उद्या बरा होईल. त्याला काय झाले आहे? तुला सतरा दुखण्यांतून मी बरी केली आहे. तू का एवढी घाबरतेस! खरोखर बालकाला तर आहेच पण आईला ही आईचाच आसरा.

वंदे मातरम्

१६) पितृवात्सल्य हे मानवाचे वैशिष्ट्य आहे. नवजात बालकाला पाहून 'पुत्रादिच्छेत्पराजयम्' हे तत्व स्वीकारावेच लागते. कारण नवजात बालक हे विश्ववृक्षाला लागलेले महान फळ आहे. त्यामध्ये निष्फळतेचा पराजय करून निष्कामता साधण्याचा दिव्य संदेश आहे.

१७) हे बालका! तुला तर कोणतीच चिंता नाही, वेषभूषा कशीही असो.

आंगाचेनि सुंदरपणे । लेणिया आंग चि होय लेणे
तेथ शृंगारिले कवण कवणे । हे निर्वचेना

अशी तुझी स्थिती. पण मातेला तुला बाळलेणी घातल्यावाचून राहवत नाही.

आत्मसुखाची बाळलेणी । लेवविसी तू

१८) झोपेतून उठलेल्या बालकाला पाहण्याला आणि झोपेतून उठताच आईला पाहण्याला आई आणि बालकाची दोघांचीही किती समुत्सुकता! बालकाचे ते सहस्रदल - कमलाप्रमाणे प्रफुल्ल मुख! आणि आईची त्याला उचलून हृदयाशी धरण्याची ती लगबग! त्या मीलनाचे कोण वर्णन करील?

१९) अति परिचयाने जगात अवज्ञा होत असते. बालकाच्या आणि मातेच्या उत्तरोत्तर परिचयाने प्रेमाने भरते येते. समान आणि समानता विकसित होते. अम्लान पुष्पांची माळा गुंफली जाते. खरोखर तो वत्स आणि ती वत्सला दोघेही परिचय आणि अपरिचयाच्या परपार असलेल्या नित्य नूतन स्वर्गातली दिव्य दैवतेच होत!

२०) हे बाळा! आज तुझा वाढदिवस. तुला त्याची कल्पनाही नाही. नित्य वर्धमान अशा तुझ्या अवस्थेत तुला पाहताना इतरांना किती आनंद होतो. इतरांची वाढ खुंटलेली. ते तुझ्या वाढदिवसात आपला वाढदिवस पाहतात. तुझे उलट सुलट होणे, तुझे रांगणे, उभे राहण्याचा प्रयत्न करणे, केवढे कौतुक! त्या प्रयत्नांत तुझे पडणे, मातेचे तुझे हात धरणे, सगळेच गोड. मातेच्या कंकणांचा आवाज, तुझ्या घुंघुरवाळ्यांचा आवाज दोहोंच्या मिश्रणाने चित्तालाही ही प्रतीति का येऊ नये?

साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे



२१) हे बालका! तुला घरात एके ठिकाणी आईच्या मांडीवरही बसणे आता आवडत नाही. तुला कोठे तरी 'दूर' घेऊन जाण्याची इच्छा होते. हरिण, ससा, काळवीट, घोडा, गाय, बैल, पोपट, मैना, पारिजात, मोगरा, चाफा, जाई, जुई पाहण्याची हौस वाटते. ही मंगल सृष्टी पहात पहात अंगणातच दही-भात खावा असे तुला वाटते. खरे ना? तुला स्वतःच्या डुलांचे कौतुक नाही. फुलांच्या डुलाने तुझे चित्त डोलते.

हे फूल ! नव्हे ही भूल । डोलतो डूल । दिव्य डौलात
पानाच्या कानी हंसत । वसतसे

२२) आई, बाबा, मामा काका, दादा - सोपे सोपे हे आप्त शब्द हे बाळा! तुझ्या तोंडातून ऐकून आईला धन्य धन्य वाटते आणि कविवचन सार्थ होते.

चुंबुनि शंभु म्हणे वा ! तुजसम आम्नाय बोलका नाही.

पण विनोबाजी म्हणतात आई! मुलाच्या कानात

आत्मा! आत्मा! आत्मा!

हा आवाज घुमू दे.

२३) अंगणात आईच्या कडेवर चांदोबा पाहून हे बालका! तुझा आवाज गगनात मावत नाही. चंद्रम्याला हातात पकडण्याच्या हव्यासाने बाल श्रीरामचंद्र रडत राहून शेवटी आरशातला चंद्र हातात आल्यावर थांबतात. सगळ्या बालकांचे असेच काही हट्टाचे हट्ट-रामायण असतेच.

२४) बालकाला आपल्यासारखे दुसरे बालक पाहिले म्हणजे किती समाधान होते! मग त्यांची परस्परांत मैत्री जमते. त्यांना दुसरी भाषाच माहीत नाही. मैत्री! मैत्री! मैत्री!

२५) घरातच जर जरा मोठे भावंड असेल तर बालकाला किती उत्साह

वाटतो. आईलाही त्यांचे ऐक्य पाहून धन्यता वाटते. तिला आपल्या सर्वसाधारण घरीच राम-लक्ष्मणांचा साक्षात्कार होतो.

छाया तनूची तनुला न सोडी
त्या बंधूंची एक तशीच जोडी
परस्परी त्यास अपूर्व गोडी
त्या मित्रभावा उपमाचि थोडी ।।

२६) दूध पाजता पाजता बालकाला ते अधिक झाले किंवा त्याला खेळ करण्याची इच्छा झाली की ते फूत्कार करून अंगावर सांडून देते. त्याची छंदोरामायणात मोरोपंतांनी केवढी विशाल कल्पना केली आहे!

महादरे मातृमुखासि पाहणे
वक्त्रांत ते दुग्ध तसे चि वाहणे
तेणे चि फूत्कार करूनि वाहणे
मंदाकिनीचा गगनी प्रवाह तो । चंद्रप्रभा पांडुर काय वाहतो

२७) बालकाला अनेक बंधुभगिनी आपल्याजवळ घेण्याला पुढे होतात. पण बालक आईला सोडू इच्छीत नाही. आईच जेव्हा म्हणते अरे! हा तुझा मामा. लगेच बालक मामापाशी जाण्याला तयार. त्याचा आईच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास!

२८) 'परक्या घरी काही मागावयाचे नाही बरं!' बालकाला समजावले जाते. तेथे समागतांसाठी कलमी आबंयाच्या फोडी तयार केल्या जात असताच बालक म्हणते 'आई! मला आंबा पाहिजे.' आई म्हणते ''अरे! तुला धीर नाही अगदी! तुला आणखी सगळ्यांना देतील ते.''

बालकापाशी आप-पर भाव नाही.

२९) सणाचा दिवस. जेवणाची पंगत. रांगोळी काढलेली. उदबत्त्यांचा



सुवास. ताटे, वाट्या, चमचे, तांबे, फुलपात्रे सगळा थाट! मोठ्या ताटात बाळासाठी अर्धा लाडू. तो पाहून बाळ रडू लागतो. त्याला लहान पण पूर्ण लाडू हवा. तो स्वतः का अर्धा आहे? त्याला लहान ताटली हवी. मोठ्यांना हे समजत नाही. हे बालोपनिषत् ते कोठून जाणणार? पूर्णात्पूर्णमुदच्यते.

३०) लहान मुलाला सर्दी झाली. शेंबूड नाकातून गळू लागला. त्याला शेंबड्या म्हणून हिणवतील. लहान मुलाचा तो केवढा अपमान. लहान मुलाला सन्मानानेच वागवले पाहिजे. तो स्वतंत्र आत्मा आहे, ही त्याची जाणीव सतत जपली पाहिजे. हलक्या हाताने शेंबूड इत्यादि अस्वच्छता काढून त्याला सहज स्वच्छतेचे भान प्रेमाने करविले पाहिजे. ही मोठ्यांची पवित्र कृती त्याला पवित्र बनवील.

३१) 'खोटे कधी बोलू नये। चोरी कधी करू नये.' ही पद्यात्मक शिकवण निषेधक असल्याने लहान मुलांच्या मुळीच उपयोगाची नाही. लहान मुलाला खोटे माहीतच नसते. जसे असेल त्यापेक्षा वेगळे सांगावे हे तो जाणतच नाही. त्यामुळे अशा शिकवणीनेच तो खोटे शिकतो. मोठ्यांची ही खोटी शिकवणच आधी गेली पाहिजे.

३२) लहान मुलाच्या आसपास आईची गोड गाणी, गीता-रामायणाचं मधुर वाचन, साधुसंतांच्या लहान लहान गोष्टी, कथा-कीर्तन-भजनाचे भक्तिमय वातावरण जर असेल तर त्याचे शुभ संस्कार दृढ होऊन त्याच्या काया-वाचा-मनात उदात्ततेचे बीजारोपण होईल आणि अनुभव येईल की

इवलेसे रोप लावियेले द्वारी
त्याचा वेल गेला गगनावरी

३३) लहान मुलांच्या कानी अपशब्द पडता कामा नयेत. भारतात अपशब्दांचा, शिव्यागाळीचा फार मोठा प्रश्न आहे.

श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन । दानेन पाणिर्न तु कंकणेन

विभाति कायः करुणापराणाम् । परोपकारैनं तु चंदनेन

३४) विडी, सिगारेट इ. व्यसनांचेही अनुकरण म. गांधींनी सुद्धा बालवयात केल्याची आत्मकथा आहे. बालकाला निर्व्यसनतेची आत्मकथा सहजपणे प्राप्त झाली पाहिजे.

३५) हे बालका! गाईला गोंजारावे, मांजराला दूध पाजावे, कुत्र्याला भाकरी टाकावी, कावळे, चिमण्या यांना भात टाकावा. घोड्याला खरारा करावा, कोंबड्याला दाणे टाकावे. याविषयी तुला केवढी आवड! हे सगळे प्राणी माणसाचे कुटुंबी बनले, त्याने माणुसकीचा विस्तार झाला. बालमनात हे मानव्य सहजच नेहमी मधुररूपाने निवास करीत असते.

भूतदया विस्तारय तारय संसारसागरतः

३६) भांड्याला भांडे लागले म्हणजे आवाज व्हावयाचाच, घर आहे तेथे कलह व्हावयाचाच असे म्हणतात. पण बालकाला कधीही असे दृश्य दिसू नये की, आई-बाप, शेजारीपाजारी कलह करीत आहेत. त्याच्या कोमल मनाला हेच योग्य की, शेजाऱ्यांवर प्रेम करावे, परस्परांवर प्रेम करावे.

३७) खोट्या ममतेने बालकाला लाह्या, लाडू, बत्तासे काही ना काही खावयास देणे हे अगदी योग्य नाही. त्याला नियमित, परिमित खाण्याची सवय लावणे सहज शक्य आहे. गीताई माऊली म्हणते ना -

'निजणे जागणे खाणे फिरणे आणि कार्य हि

मोजूनि करितो त्यास योग्य हा दुःखनाशन

३८) लहान मुलाला भुतेखेते बागुलबोवा, कसलेही भय दाखवू नये. त्याला निर्भय बनवावे. अंधाराला मुले भितात. त्यांना अंधारात सहसा जाऊ देऊ नये. अंधाराची भीती हळू हळू कमी करावी. ॐ असतो मा सद्गमय।



तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योर्माऽमृतं गमय.

३९) हे बालका! तुला कर्मयोग किती प्रिय! आईला मदत करण्यात तू किती तत्पर! भांडी घासणे, पाणी भरणे, झाडांना पाणी घालणे, तुळशीला पाणी घालणे तुला आवडते. त्याचे वर्णन कोण करील?

४०) मुलांच्या ठिकाणी आसक्ति नाही. खेळात रंगलेली मुले एकदम खेळ सोडून मोकळी होतात. एकमेकांशी गट्टी करतात. ती लगेच 'गट्टी फू' करतील. पुन्हा क्षणात गळ्यात हात घालून गोड बोलतील. याहून बोधाचा शोध आणखी कोठे करणार?

पक्षी अंगणी उतरती । ते का गुंतूनि राहती

मुली घरचार बांधिला । खेळ मोडोनी टाकीला

वस्तीकर वस्ती आला । प्रातःकाळी उठोनि गेला

ऐसे असावे संसारी । जोवरी प्राचीनाची दोरी

४१) दारावर दरवेशी आला. आस्वलवाला आला. माकडवाला आला. भिकारी आला म्हणजे बालकाला केवढे कौतुक वाटते. या बहुरुपी जगात असे आणखी विविध बहुरुपी पाहून मुलांचे मन एकदम वेधते. परंतु आकस्मिकपणे येणाऱ्या या दृश्यापेक्षा सार्वजनिक बागेत जेथे निरनिराळे पशुपक्षी ठेवलेले असतात. तेथे मधून मधून नियमाने मुलांचे रंजन करण्याचा थोरांनी पायंडा पाडला पाहिजे.

करी मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभुशी तयाचे

- साने गुरुजी

४२) मुलाला अक्षरशिक्षण द्यावयाचे तर ते आईनेच. आधी लहान लहान चित्रे शिकवावयाची. सूर्य, चंद्र, पोपट, कावळा, चिमणी. त्यामुळे मुलाचा हात वळेल आणि अक्षरांचा कंटाळवाणेपणा त्यात असणार नाही.

मग आई, गुरु, देव गणपती इ. अनेक सरळ जोडाक्षररहित अक्षरे शिकविता येतील.

अक्षरावगमलब्धये यथा । स्थूलवर्तुलदृषद्परिग्रहः
नित्यशुद्धपरिलब्धये तथा । दारुमृण्मयाशिलामयार्चनम्

४३) हे बालका! तुझा स्वर किती मधुर! श्रीकृष्णाच्या मुरलीचा आरोहअवरोहच जणू! अशा स्थितीत तुला जर गायन ऐकण्याची जोड मिळाली तर तूही संगीताच्या साधुसंगतीत रमशील आणि कविवचन सार्थ करशील.

जी हरिहरप्रसादी कल्याणे वसति साधुसंगीती
अध शमते मन रमते सुख गमते जेवि दिव्य संगीती

४४) हितोपदेश, पंचतंत्र, यांचा उद्देश जरी चांगला असला तरी त्यात एकात एक कथा अडकल्या आहेत. शिवाय त्या शुभसंकारांच्याही नाहीत. त्या ऐवजी गीताई नीतीकथा, सचित्र इसापनीती कथा बालकांना ऐकवून थोरांनी आत्म-बोधाचा अनुभव घेणे अतिशय लाभाचे आहे. विनोबाजींनी उत्तम पुस्तकात इसापनीतीची गणना केली आहे.

साधु बोध झाला । तो नुरोनीया ठेला
ठायी च मुराला । अनुभव

४५) मोठ्यांनी लहानांच्या खेळात, गोष्टींत, विचारांत, नेहमी रस घेतला नाही तर लहानात न्यूनगंड निर्माण होण्याचा संभव असतो. खरोखर मोठ्यांना लहानपणीची निर्व्याजता, सरळपणा, लहान मुलांच्याशिवाय कोठून मिळणार? म्हणून हाच विचार योग्य आहे की

चित्ते प्राणे जसे मी चि एकमेकांस बोधिती
भरूनि कीर्तने माझ्या ते आनंदांत खेळती

४६) तुलनामोह मोठमोठ्यांनाही आवरत नाही. मुलामुलांत कधी ही



या मोहाला स्थान देऊ नये. हा मुलगा किती हुशार, किती गुणी, किती आज्ञाधारक, त्याचप्रमाणे तू नाहीस. त्याचा थोडा तरी गुण घेत जा, असे! म्हणणे सर्वथैव त्याज्य समजावे. एकाच घरातल्या भावंडात ही तुलना कधी ही करू नये. मुलांच्या कोवळ्या मनावर नेहमी बोधाचा, प्रेमाचा आणि आनंदाचा ठसा उमटवला पाहिजे. मुलाच्या मनावर आघात म्हणजे मुलाचा घातच होय.

४७) बाल म्हणजे बलवान् ! नवयुगाचा प्रभात काळ! हर्षाचा वर्षाव! आशेचा कल्पवृक्ष! तो शंकराचार्य, शिवाजी, राणाप्रताप काय बनेल कोण सांगू शकेल? उपनिषदे म्हणतात. तो महान् अश्व त्याचे बीज आहे.

यत् त्वं न निभालयसे । तत्त्वमसि श्वेतकेतो

४८) सत्य, शक्ती, ज्ञान, व्यवस्था, सौंदर्य - ह्या पंचशीलाची सवय, हे बालिके! हे बालका! तुझ्या जीवाचा ही जीव बनू दे. तुझ्या नसानसात हे पंचशील सतत खेळू दे - तुझा या जगात विजयच विजय होईल!

४९) निर्दोष बालबालिकांचे दर्शन भाग्याचेही भाग्य होय! ते फुलामुलांचे अपार विश्व कवी च वर्णू शकतो.

आकाशात फुले धरेवर फुले वाऱ्यावरी ही फुले
माझ्या गेहि फुले मनातही फुले भूगर्भि सारी फुले
माझे चित्त भुले सुगंधित भले हे विश्व हो जाहले
कोणाला कळले किती पसरले उद्यान हे शोभले

५०) भगवान् -
प्रेममूर्ति!
कारुण्यमूर्ति!

ज्ञानमूर्ति!

क्षमामूर्ति!

हे बालिके ! हे बालका! यातच अक्षय स्फूर्ति भरलेली आहे.

५१) हे बालिके! हे बालका! पुढील कृष्णमूर्तींचे ध्यान सर्व जीवन सदोदित नवजीवन बनवील.

अंग वक्र अधरी धरि पावा
गोप-वेष हरि तो चि जपावा.
वाम बाहुवरि गाल हि डावा
तो ठसा स्वहृदयात पडावा.

र र र

।। श्री विश्वनाथो विजयते ।।


## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

**विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी**

**(०२५६२) २३३८४८**

| अ.न. | पुस्तकाचे नांव |
|---|---|
| १) | छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे |
| २) | अमृतानुभव |
| ३) | गीताई धर्मसार |
| ४) | स्मृतीशलाका |
| ५) | कॅटलॉग |
| ६) | धुळे व नंदुरबार जिल्ह्यांचे स्वातंत्र चळवळीतील योगदान |
| ७) | निबंधसंग्रह भाग १ |
| ८) | संशोधक (कॉंग्रेस शताब्दी विशेषांक) |
| ९) | नागपुरकर भोसल्यांचे चिटणीशी बयान् |
| १०) | जागतिक बालक वर्षानिमित्त |
| ११) | ज्ञानेश्वर नितीकथा |
| १२) | नंदुरबार दप्तर |
| १३) | शिवछत्रपतीची १०९ कलमी बखर |
| १४) | आज्ञापत्र |
| १५) | योग चिंतामणी |
| १६) | वेडिया नागेश |
| १७) | नवरस रागमाला |
| १८) | तात्या जोगाच्या चरित्राची साधने |
| १९) | इ.वि.का. राजवाडे समग्र साहित्य (खंड ४ ते १०) |
| २०) | मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड १ ते ११) |
| २१) | मराठी हस्तलिखित ग्रंथ |
| २२) | दुर्मिळ संच (संशोधक) |
| २३) | छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती |
| २४) | द सोर्सेस ऑफ मराठा पिरिएड (५ खंड) इंग्रजी |
| २५) | राजवाडे चरित्र |

Cover Design : Nikhil Jain ( 97 3033 2443 )